सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता “निसर्ग पर्यटन” योजनेंतर्गत स्व.उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती (२४०६ २२९५) लेखाशीर्षांतर्गत निधी उपलब्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः सावવि-२०१८/प्र.क्र.८१/फ-११

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २६ मार्च, २०१९

वाचा :-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. अंदाज-२०१५/ प्र.क्र.३६/ फ-११, दि. १६.०६.२०१५.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८.
३) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक- कक्ष-१/पी/या/चाबाप्र/प्र.क्र.२०/२२४/२०१८-१९, दि. ११.०५.२०१९
४) महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्रमांक साववि-२०१८/प्र.क्र.८१ /फ-११, दि. ०८.०६.२०१८
५) महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्रमांक साववि-२०१८/प्र.क्र.७९ /फ-११, दि. ०८.०६.२०१८
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क.६९/अर्थ-३, दि.२५.०१.२०१९
७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क.४२/अर्थ-३, दि.०८.०३.२०१९
८) महसूल व वन विभागाचे शासन ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१९/२४०६/प्र.क्र.१९/ब-१, दि. ११.०३.२०१९
९) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक- कक्ष-१/पी/या/चाबाप्र/प्र.क्र.२०/२२९५/२०१८-१९, दि. ११.०३.२०१९
१०) महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्रमांक साववि-२०१८/प्र.क्र.८१ /फ-११, दि.२०.०३.२०१९
११) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक- कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.२०/२४२२/२०१८-१९, दि. २२.०३.२०१९

प्रस्तावना :-

सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात मागणी क्र.-७, **२४०६, वनीकरण व वन्यजीवन, राज्य योजनांतर्गत योजना, ८००(०२)(०६) निसर्ग पर्यटन (राज्य) (२४०६ २२९५) योजनेंतर्गत स्व.उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती** साठी रु.२०००.००लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. त्यापैकी संदर्भ क्र. २ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दि.०२.०४.२०१८ नुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित निधीच्या ७०% मर्यादेत रु.१४००.०० लक्ष इतका निधी संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णय दि. ८.०६.२०१८ अन्वये वितरित करण्यात आलेला आहे. आता संदर्भ क्र.५ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दि.२५.०१.२०१९ नुसार, अर्थसंकल्पित निधीच्या ८० % म्हणजेच सुधारित अंदाजाच्या मर्यादेत रु. १६००.०० लक्ष निधी वितरीत करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुषंगाने सदर योजनेसाठी उर्वरित १० % रु. २००.०० लक्ष निधी संदर्भ क्र. १० येथील शासन निर्णय दि. २०.०३.२०१९ अन्वये असे मिळून एकूण रु. १६००.०० लक्ष निधी वितरित करण्यात आलेला आहे.

२. स्व.उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती (२४०६२२९५) या योजनेअंतर्गत सन २०१८-१९ मध्ये प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व वित्त), महाराष्ट्र राज्य राज्य नागपूर यांनी रु. ११.०३.२०१९ च्या पत्रान्वये या योजनेसाठी रु.२२२५.५१ लक्ष निधीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यापैकी रु. ४७३.०८लक्षच्या प्रस्तावाचे तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेबाबतचा तपशिल सादर केलेला नसून रु. १७५२.४३ लक्ष निधीच्या प्रस्तावासाठी तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेबाबतचा तपशिल सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९ नुसार अर्थसंकल्पित निधीच्या ८०% मर्यादेत एकूण रु.१६००.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे. (शासन निर्णय दि. ८.०६.२०१९ व शासन निर्णय दि.२०.०३.२०१९) उर्वरित रु. १५२.४३ लक्ष रकमेचा प्रस्तावासाठी निधी वितरणाची आवश्यकता आहे.

३. लेखाशिर्ष २४०६२२९५ अंतर्गत पाणथळे, सरोवरे इ. ठिकाणच्या जैव विविधतेचे व्यवस्थापन (२४०६ २२९५) या योजनेकरिता सन २०१८-१९ करिता रु. २००.०० लक्ष चे अर्थसंकल्पिय अंदाज मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी शासन निर्णय दिनांक ८ जून २०१८ अन्वये रु. १४०.०० लक्ष वितरित करण्यात आलेले आहे. वित्त विभागाने सदर योजनेसाठी रु.१६०.०० लक्षचे सुधारित अंदाज मंजूर केले असून सुधारित अंदाजांच्या मर्यादेत रु. २०.०० लक्ष निधी वितरित करणे शिल्लक आहे. सद्यस्थितीत सदर योजनेंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या कामांचा आढावा घेतला असता दि.८ जून २०१८ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेल्या रु.१४०.०० लक्ष निधीपैकी रु.५५.६७ लक्ष इतका खर्च होणार असून उर्वरित रु. ८४.३३ लक्ष तसेच वित्त विभागाचे दि.२५.०१.२०१९ चे परिपत्रकानुसार सुधारित अंदाजाच्या मयादेत उर्वरित रु.२०.०० लक्ष निधी असे मिळून एकूण १०४.३३ लक्ष निधी शिल्लक राहणार आहे. सदर निधी त्याच लेखाशीर्षाखालील स्व.उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती च्या योजनेसाठी उपलब्ध करुन द्यावा असे संदर्भ क्रमांक ११ येथील पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांनी प्रस्तावित केले आहे. दोन्ही योजना एकाच लेखाशीर्षांतर्गत, एकाच संगणक संकेतांकाअंतर्गत कार्यरत असल्याने, स्वतंत्र पुनर्विनियोजन करण्याची आवश्यकता नसलयाने पाणथळे, सरोवरे इ. ठिकाणच्या जैव विविधतेचे व्यवस्थापन (२४०६ २२९५) या योजनेमधून रु. १०४.३३ लक्ष निधी स्व.उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती (२४०६ २२९५) उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या “निसर्ग पर्यटन” राज्य योजनांतर्गत योजना, सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात पाणथळे, सरोवरे इ. ठिकाणच्या जैव विविधतेचे व्यवस्थापन (२४०६ २२९५) या योजनेसाठी वितरित केलेल्या रु. १४०.०० लक्ष पैकी अखर्चित असलेले रु.८४.३३ लक्ष तसेच सदर योजनेच्या सुधारित अंदाजाच्या मर्यादेत वितरणासाठी शिल्लक असलेले १० % रु. २०.०० लक्ष असे **एकूण रु. १०४.३३ लक्ष निधी (०२)(०६), स्व.उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मितीसाठी (२४०६ २२९५) खर्च करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.**

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. वितरित करुन घेतलेला निधी मंडळे/ महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधी मध्ये काढून ठेवता येणार नाही. तसेच सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजनेअंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून वित्त विभागाच्या संदर्भिय दिनाक ०२.०४.२०१८ परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. सी-०७,
२४०६, वनीकरण व वन्यजीवन,राज्य योजनांतर्गत योजना,
८००(०२)(०६) निसर्ग पर्यटन (राज्य)
स्व.उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती (२४०६ २२९५)

६. सदर शासन निर्णय (१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.१.२०१९ (२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि.०८.०३.२०१९, (३) महसूल व वन विभागाचे शासन ज्ञापन क्रमांक -बीयुडी-२०१९/२४०६/प्र.क्र.१९/ब-१, दि. ११.०३.२०१९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२६१२१८३९३७१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DAMODHAR SITARAM DALVI

Digitally signed by DAMODHAR SITARAM DALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=ef72079fa46879c38e604681191069c57000e73e78700748258ef7a9095f84d9, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f62a7252ed770981b2324209adc4d21c5f260d6817740e3a114e91e153b61422, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DAMODHAR SITARAM DALVI
Date: 2019.03.26 12:22:37 +05'30'

(दामोधर दळवी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)

५. वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण (६ वृत्त)

६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)

७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,

८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.

१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई

११. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२

१२. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१५. निवडनस्ती/फ-११.